Ibi Lepscky

Albert Einstein

Illustrated by Paolo Cardoni

Translated by Ruth Parte Craig



इबी लेप्स्की

अल्बर्ट आईनस्टाईन

चित्रं : पाऊलो करदोनी




About one hundred years ago, there lived a boy named Albert Einstein.
Albert was a strange boy. Always absentminded.
Always messy.
It was a difficult job for him to tie his shoes.

सुमारे १०० वर्षांपूर्वी, अल्बर्ट आईनस्टाईन नावाचा एक मुलगा होता.
अल्बर्ट जरा विचित्र मुलगा होता. तो सतत काहीतरी विसरायचा, गोंधळलेला असायचा.
साधं आपल्या बुटांची लेस बांधायला सुध्दा त्याला जमत नव्हतं.




But he know how to play the violin very well.
He did not like to play marbles or ball like other boys his age. Instead, he enjoyed looking for hours and hours at the shape of a leaf and playing with wooden blocks like a little child.

पण तो व्हायोलिन खूप छान वाजवायचा.
त्याला त्याच्या वयाच्या मुलांसारखं गोट्या किंवा चेंडू खेळायला आवडत नसे. त्याऐवजी तो एखाद्या झाडांच्या पानाचा आकार तास न तास न्याहाळायचा. लहान मुलासारखा लाकडी ठोकळे खेळत बसायचा.




He disliked long sleeves, and as soon as he could, snip went the scissors as he cut his sleeves above the elbow. He was not interested in the boys in his neighborhood, who invited him to play war. He preferred to chase the white chickens scratching in the garden and to try to make friends with them.

त्याला शर्टाच्या पूर्ण बाह्या आवडत नसत. संधी मिळताच तो कात्रीनं कापून शर्टाच्या बाह्या आखूड करायचा.
त्याला शेजारपाजारच्या मुलांबरोबर खेळण्यात अजिबात रस नव्हता कारण ते युध्दाचा खेळ खेळायचे.
अंगणात जमिनीवर बागडणा-या पांढ-या कोंबड्यांमागे धावायला आणि त्यांच्याशी दोस्ती करायला त्याला जास्त आवडायचं.




Albert felt happy only in the company of his little sister, Maja, whom he loved very much and who looked exactly like him. They were as alike as two drops of water.

अल्बर्टला फक्त आपली धाकटी बहिण माजा आवडायची.
माजावर त्याचं खूप प्रेम होतं, ती अगदी त्याच्यासारखीच दिसायची.
पाण्याच्या दोन थेंबांसारखे ते एकसारखे दिसायचे.



"Albert is stupid," said his cousins when they came for a visit and tried to make him join in their games.

“अल्बर्ट मूर्ख आहे” त्याच्या घरी खेळायला आलेला त्याचा
चुलतभाऊ एकदा म्हणाला. आपल्या खेळात त्याला ओढून घ्यायचा
तो प्रयत्न करत होता.




Albert ignored them and, with his sister, watched a colony of ants busy at work. He was a child different from others.

पण अल्बर्ट त्यांच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करायचा आणि आपल्या बहिणीबरोबर मुंग्या वारुळ बांधताना बघत बसायचा. तो इतरांपेक्षा वेगळा मुलगा होता.



His parents loved him very much, but they were very worried about him.
"Albert is a good boy," said his father one night. "But I would like it if he would study a little more and if he would show some interest in history and geography.“

आई वडिलांचं त्याच्यावर प्रेम होतं. पण त्यांना त्याची काळजीही वाटायची.
“अल्बर्ट चांगला मुलगा आहे..” त्याचे वडील एके रात्री म्हणाले. “पण त्यानं जरा अभ्यासात लक्ष घातलं आणि इतिहास / भूगोल अशा विषयांमध्ये रुची दाखवली तर बरं होईल.”




It was true, Albert did not like school. He hated history and geography, and he refused to memorize any lessons. He was interested only in learning arithmetic.

अल्बर्टला शाळा आवडत नव्हती हे खरंच होतं. त्याला इतिहास आणि भूगोल तर अजिबातच आवडत नव्हते. त्याला घोकंपट्टी आवडत नव्हती. त्याला फक्त बीजगणित शिकण्यात रस होता.



"It would be nice if you could leave, Albert," a teacher told him one day. "Your behavior at school, so distracted and absentminded, and your poor interest in all I teach set bad examples for the whole class."

“अल्बर्ट, तू शाळा सोडलेली बरी”. एक दिवस त्याचे शिक्षक म्हणाले. “तुझं वर्गात लक्ष नसतं. तू विसराळू आहेस. मी शिकवतो त्यात तुला अजिबात रस नाही हे सगळं इतर मुलांपुढे चुकीचं उदाहरण आहे.”



Albert did not even like sports and gymnastics. His classmates gave him the nickname of ''Albert the Incapable."
One day, an older boy dared him by saying, "Look in my eyes if you are brave enough.”

अल्बर्टला खेळ आणि जिम्नॅस्टिक्स पण आवडत नव्हतं. त्याच्या वर्गमित्रांनी त्याला “नादान अल्बर्ट” असंच नाव ठेवल होतं.


एक दिवस, त्याच्यापेक्षा एका मोठ्या मुलानं त्याला “तू धीट असशील तर माझ्या नजरेला नजर भिडव” असं आव्हानच दिलं.



Albert did not even realize it was a dare—he was so unaware of things. With his arms hanging at his sides and a faraway look on his face, he seemed lost in another world. And he gently replied, ''Excuse me, but I'm not interested in your eyes."
The older boy was confused and left, grumbling to himself.

तो मुलगा आपल्याला आाव्हान देतोय असं अल्बर्टच्या लक्षातही आलं नाही.

अल्बर्ट एकदम भोळा होता. त्याचे खांदे पडलेले असायचे आणि चेह-यावर भलत्याच दुनियेत हरवल्याचे भाव असायचे. त्याच तंद्रीत तो म्हणाला, “मला माफ कर.. पण तुझ्या डोळ्यात डोळे घालून पहाण्यात मला रस नाही”. तो थोराड मुलगा गोंधळून पुटपुटत निघून गेला.




That night, watching Albert outside, his father spoke to his mother. "I don't understand how a child could spend so many hours looking at the sky."

त्या रात्री बाहेर फिरणा-या अल्बर्टला पाहून त्याचे वडील त्याच्या आईला म्हणाले, “हा मुलगा आकाशाकडे बघत तास न तास कसा घालवतो हेच मला समजत नाही.़३

His mother smiled and said, "He is trying to see God, He imagines that God is hidden among the clouds, comfortably stretched out in an armchair of granite."
''Oh," sighed his father. "Who will ever be able to understand what Albert has in his mind?'‘

त्याची आई स्मितहास्य करुन म्हणाली, “तो देव शोधत असावा. देव ढगात एका आरामखुर्चीवर निवांत लपून बसला आहे असं त्याला वाटत असणार.”

त्याचे वडील एक सुस्कारा टाकून म्हणाले, “अल्बर्टच्या डोक्यात काय चाललेलं असतं ते कोणाला कधी कळेल का”?




Albert's mother felt a special love and tenderness for Albert. She painted his picture on a little cup, and for the occasion, he was unusually well-groomed. The little cup was always displayed on the family's fireplace.

अल्बर्टच्या आईचं अल्बर्टवर विलक्षण प्रेम होतं. तिनं त्याचं चित्र एका कपावर काढलं होतं. त्या चित्रात तो चक्क आपला वेंधळेपणा सोडून नीटनेटका दिसत होता. तो लहान कप घरात फायरप्लेसवर ठेवलेल्या कुटुंबाच्या वस्तूंमध्ये कायम असायचा.



Albert's mother loved music very much, and in the evenings, she and Albert would improvise little concerts for the rest of the family. She would be at the piano and Albert at the violin.

अल्बर्टच्या आईचं संगीत या प्रकारावर खूप प्रेम होतं. संध्याकाळच्या वेळी ती आणि अल्बर्ट घरातल्या लोकांसमोर एक कॉन्सर्ट सादर करायचे. आई पियानो वाजवायची आणि अल्बर्ट व्हायोलिन वाजवायचा.



One day, when Albert had a fever and had to stay in bed for a few days, his father gave him a compass.
"Albert, you can pretend to be the captain of a ship," said his father, "and control the route with the compass."

एकदा अल्बर्टला ताप आला आणि त्याला अंथरुणात काही दिवस पडून रहावं लागलं. तेव्हा त्याच्या वडिलांनी त्याला एक होकायंत्र दिलं.
“अल्बर्ट, तू एका जहाजाचा कप्तान आहेस आणि होकायंत्रानं जहाजाचा मार्ग ठरवतो आहेस अशी कल्पना कर”.



But Albert was not interested in the game his father suggested. He wanted to know right away why the compass needle was pointing to the big N and what were magnetic fields all about and where were the poles of the earth. He asked question after question.
It seemed they would never end.
Finally his father, exhausted, said curtly, "Because that's the way it is. That's all."

पण अल्बर्टला वडिलांनी सुचवलेला खेळ खेळण्याची बिलकुल इच्छा नव्हती. त्याला होकायंत्रातली सुई उत्तर दिशा का दाखवते आहे, मॅग्नेटिक फील्डस म्हणजे काय आणि पृथ्वीचे उत्तर आणि दक्षिण ध्रुव कुठे आहेत यात रस होता. तो प्रश्नांमागून प्रश्न विचारायला लागला. त्याचे प्रश्न संपायलाच तयार नव्हते.
अखेरीस त्याचे वडील थकून कठोरपणे म्हणाले, “गोष्टी तशा आहेत म्हणून तशा आहेत.. बस.”



Later, Albert's father, thinking back about the boy's questions, was amazed that they were such thoughtful questions, so precise and sharp. Suddenly, he realized the truth about Albert. It was a truth that filled him with anguish, pride, and tenderness.

पण नंतर अल्बर्टच्या वडिलांनी त्या प्रश्नांबाबत विचार केला तेव्हा त्यामागचा सखोल विचार, नेमकेपणा आणि अचूकपणा जाणवून त्यांना आश्चर्य वाटलं. अचानक, अल्बर्टबाबत त्यांना एक वास्तव गोष्ट जाणवली. जे वास्तव जाणवून त्यांना अभिमान वाटला आणि हळवेपणा दाटला.



Albert was indeed a child different from all others. His gaze, which everyone thought to be absentminded, really reflected a very busy mind, a mind that was exploring places where nobody else could follow. It was the mind of a genius.

खरोखरच अल्बर्ट इतर मुलांपेक्षा भिन्न होता. त्याची इतरांना विसराळूपणा वाटेल अशी हरवलेली नजर प्रत्यक्षात एका विचारमग्न मेंदूची निदर्शक होती. इतरांची नजर जिथे पोहोचू शकतच नसेल अशा ठिकाणी त्याचा मेंदू पोचत होता. तो खरोखर एका विलक्षण बुध्दिमान व्यक्तीचा मेंदू होता.



Albert's father was not mistaken.
When Albert grew up, his interest in every process of nature and science never stopped. He became a great scientist and developed new theories in physics that radically changed people's ideas about the universe. He discovered scientific truths never known before.
His mind made some of the greatest contributions in the history of human thought.

अल्बर्टच्या वडिलांना वाटलेलं अजिबात चुकीचं नव्हतं.

मोठा झाल्यावर अल्बर्टचं निसर्ग आणि विज्ञान यातल्या प्रक्रियांचं कुतूहल कधीच थांबलं नाही. तो एक महान शास्त्रज्ञ बनला आणि त्यानं शोधून काढलेल्या भौतिकशास्त्रातल्या थिअरीजनं लोकांच्या विश्वाबद्दलच्या संकल्पनांना संपूर्ण वेगशोधून काढळं वळण दिलं. आधी कोणालाच न कळलेली वैज्ञानिक गुपितं त्यानं उलगडली.

मानवजातीच्या विचारप्रक्रियेत त्याच्या मेंदूनं दिलेलं योगदान अतुलनीय ठरलं.

End